ISSN 2319 - 8508

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GALAXY LINK

Volume - X Issue - I November - April - 2021-22

English / Marathi Part - I

**Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 47023**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.571
www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"GALAXY LINK"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta6060@gmail.com, www.ajantaprakashan.com

**GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - Impact Factor - 6.571 (www.sjifactor.com)**

# EDITORIAL BOARD


**Anukrati Sharma**
Assot. Prof. Management,
University of Kota, Kota.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept. of Commerce
& Management University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. Avhad Suhas Dhondiba**
Assot. Prof. in Economics, Sahakar Maharshi
Bhausaheb Satntuji Thorat College of Arts,
Science & Commerce, Sangamner (M.S.)

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University, Karaikal - 609605.

**Dr. Kishore Kumar C. K.**
Coordinator Dept. of P. G. Studies and Research in
Physical Education and Deputy Director of
Physical Education, Mangalore University.

**Prof. U. B. Mohapatra**
Ph.D. (Nottingham, UK) Director,
Biotechnology Government of Odisha, Odisha
Secretariat Bhubaneswar - 751001, Odisha, India.

**Dr. Bibhuti P. Barik**
P. G. Dept. of Bioinformatics, North Orissa
University Shriramchandra Vihar, Takatpur,
Baripada, Odisha, India, Pin 757003.

**Dr. Vijaykumar Laxmikantrao Dharurkar**
Prof. and Head of Mass Communication and
Journalism, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad - 431004 (M.S.)

**Jatindra K. Sahu**
Ph.D. Assot. Prof. Dept. of Agriculture Engineering
School of Technology Assam University (A Central
University Silchar - 788011] Assam, India.

**Prof. S. D. S. Murthy**
F.N.E.A., Head, Dept. of Biochemistry,
S. V. University Tirupati - 2,
Andhra Pradesh, India.

**Dr. Madhukar Kisano Tajne**
Dept. of Psychology,
Deogiri College, Aurangabad.



**PUBLISHED BY**

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF ENGLISH PART - I


| S. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | Social Empowerment of Women<br>**Dr. Sauli Mitra** | 1-7 |
| 2 | Sustainable Development, Agenda 2030 & Environment Technology<br>**Dr. M. S. Bisen** | 8-13 |
| 3 | An Influence of E-Learning, as a Component of Digitalization on Learners and the Teaching Profession<br>**Dr. Sarika Sagar**<br>**Dr. Minal Paranjape** | 14-24 |
| 4 | A Study of Nature and Scope of History<br>**Sainath Manohar Gaikwad** | 25-29 |
| 5 | A Study: Causes of Poverty in India<br>**Mr. Kmalkishor S. Tode** | 30-35 |
| 6 | Physical Fitness between Teaching and Non-teaching Staff: A Comparative Study<br>**Dr. Jagdhish Prabhuling Zadhuke**<br>**Smt. Manisha Shankar Shinde** | 36-40 |
| 7 | Guidance Needs of Secondary School Students with Respect to their Parental Education<br>**J. Nagabhooshanam** | 41-46 |
| 8 | A Study on Various Aspects that Motivates Housewives to Buy Online Apparels in Thane District<br>**Ms. Varsha Sawlani**<br>**Dr. P. S. Jadhav** | 47-53 |
| 9 | Indian Women's Status in Sports: in 21st Century<br>**Dr. Salampure Fulchanad B.** | 54-57 |
| 10 | Tribes of Bengal and their Wall Paintings in Manbhum<br>**Dr. Subrata Kumar Mandal** | 58-63 |
| 11 | An Overview of Investment in Bonds & External Commercial Borrowing<br>**Harika Paruvelli**<br>**Dr. Sindhu** | 64-69 |

# CONTENTS OF ENGLISH PART - I


| S. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 12 | Impact of the TPACK Application Suite on Technological Proficiency of Pre-Service Teachers in Medchal-Malkajgiri District of Telangana State<br>**Sayam Deepathi** | 70-76 |
| 13 | The Impact of COVID-19 on Sports & Physical Activity<br>**Dr. N. N. Lokhande** | 77-81 |
| 14 | Image Processing with Machine Learning Proving to be Helping Tool for Detection and Cure of Skin Diseases<br>**Diwane Rohit Bhausaheb**<br>**Dr. Shahaji Shivaji Chandanshive** | 82-86 |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | कांशीरामजी आणि बहुजन समाज पक्षाची यशस्वी वाटचाल याचा संशोधनात्मक अभ्यास<br>**श्रीमती. जयश्री सोनकवडे** | १-८ |
| २ | संत शेख महंमद महाराज आणि त्यांची वंशपरंपरा<br>**डॉ. नवनाथ दत्तात्रय वाजगे** | ९-१२ |
| ३ | लोकमान्य टिळकांचा समकालीन मराठी साहित्यावरील प्रभाव<br>**डॉ. संजयकुमार कोळी** | १३-१७ |
| ४ | महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्राध्यापक, विभागप्रमुख व प्राचार्य यांना होणाऱ्या फायद्यांचा अभ्यास<br>**डॉ. पाठक सुहास सखाराम**<br>**झाकडे अर्चना प्रल्हाद** | १८-२२ |
| ५ | स्वतंत्र भारतातील बंजारा स्त्री<br>**डॉ. लक्ष्मण पवार** | २३-२७ |
| ६ | इंग्लंडची औद्योगिक क्रांती व त्याचा भारतावर पडलेला प्रभाव<br>**स्वप्नील देवराव मलोडे**<br>**प्रा. डॉ. आर. पी. किरमीरे** | २८-३२ |
| ७ | इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यासाठी जलद गतीने शिक्षण<br>**श्री. महेश मधुकर पालकर**<br>**प्रो. डॉ. मेघा म. उपलाणे** | ३३-३८ |
| ८ | कोवीड-१९ चा आंतरराष्ट्रीय धोरणांवर पडलेला प्रभाव<br>**डॉ. एस. आर. पाटील** | ३९-४२ |
| ९ | अन्नभेसळ व कायदे एक अभ्यास<br>**डॉ. गंगासागर तुळशीदास चोले** | ४३-४७ |
| १० | शाश्वत विकासामध्ये मानव विकास निर्देशांकाची भूमिका<br>**डॉ. प्रमोदिनी नवले (कदम)** | ४८-५१ |
| ११ | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने व उपाय<br>**प्रा. डॉ. संजय मारोतराव देबडे** | ५२-५४ |

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | घुसमटणी : एक संवेदनशील कथासंग्रह - किशोर घोरपडे<br>**कु. मस्के प्रणिता लक्ष्मणराव** | ५५-५८ |
| १३ | मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे लहान मुलावर होणारे दुष्परिणाम आणि त्यावरील उपाय<br>**प्रा. डॉ. विलास सोमाजी पवार** | ५९-६२ |
| १४ | औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या आंतरक्रियाचा अभ्यास<br>**डॉ. एस. एस. पाठक**<br>**तायडे दंडपाल भिमराव** | ६३-७३ |

# १४. औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या आंतरक्रियाचा अभ्यास

**डॉ. एस. एस. पाठक**
सहाय्यक प्राध्यापक, पदव्युत्तर, शिक्षणशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
**तायडे दंडपाल भिमराव**
संशोधक विद्यार्थी.

**सारांश**

विद्यार्थ्यावर चांगले संस्कार व्हावेत आणि त्याच्या जीवनाच्या विकास योग्य दिशेने आणि योग्य प्रकाशने व्हावा यासाठी शिक्षकांनी मुलांवर चांगले संस्कार केले पाहिजेत. हे संस्कार अनेक प्रकारे, अनेक मार्गाचा अवलंब करून करता येतात. उत्तर श्लोक, सुभाषिते सुविचार, कवने, काव्य इत्यादी साहित्य प्रकार हे त्या, त्या भाषेचे अलंकार असतात. शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्याचे वय, प्रगल्भता इत्यादी विचारात घेऊन त्याच्याकडून सोप्या भाषेतील पण सुआशय युक्त असे पाठांतर करून घ्यावे.

प्रत्येक सुविचार एका लहानशा कागदावर स्पष्ट व सुवाच्या अक्षरात लिहावा आपल्या विद्यार्थ्यांकडून लिहून घ्यावा. अश्या प्रकारच्या अनेक कृती शिक्षकांना विद्यार्थ्याच्या बाबतीत करता येतील उदा कविता वाचन व लेखन निबंध लेखण व वाचन इत्यादी.

शिक्षकांनी विद्यार्थ्यावर चांगले संस्कार निर्माण करण्यासाठी स्वतः सुद्धा संस्कारक्षम असावे आणि संस्काराची जाणिव जागृत असावे.

**प्रस्तावना**

येत्या १० वर्षातील शिक्षकांना वर्गामध्ये क्लास कंट्रोल करणे कठिण होऊ लागले ADHD Learning Disabilities Lack of Concentration या सारख्या समस्याचे प्रमाण वाढले वर्गातील दोन-तीन 'ढ' मुलांमुळे अख्या वर्ग डिस्टर्ब होऊ लागला त्यात हायपर ॲक्टिव्ह मुलांच्या समस्या वेगळ्यात होत्या त्या हाताळायच्या कशा हा शिक्षकासमोर प्रश्न पडला.

शिक्षक हक्क कायद्याच्या गैरवापरामुळे विद्यार्थ्यांना मारणे सोडा साधे रागावणे कठिण होऊन बसले आहे. शिस्त लावण्यासाठी शिक्षा द्यावी तर काय द्यावी दयावी हा प्रश्न पडला वर्गाच्या बाहेर काढले तर पालक भाडायला येतात कि तो/ती वर्गाच्या बाहेर राहील्याने तिचे शैक्षणिक नुसकान झाले, वर्गात उभे केले तर पालक ओरडतात कि त्याच्या मानसिकतेवर परिणाम झाला आता तो शाळेत यायला तयार नाही म्हणतो कान पकडून उठाबशा काढायला सांगितले तर पालक दुसऱ्या दिवशी मेडिकल सर्टिफिकेट घेऊन येतात.

खुप त्रास देतो म्हणून कुठल्या ॲक्टिव्हिटीमधून काढून टाकले तर लगेच पालक म्हणतात आम्ही फी भरली आहे त्याला ॲक्टिव्हीटीमध्ये घ्या तशी स्कुल डायरीमध्ये नोट्स येते. टिचरने त्याच्याशी बोलणे सोडले तर पालक लगेच

म्हणतात पाहू, शिक्षक किती दिवस बोलत नाही तुझ्याशी तू स्वतःहून बोलू नकोस. मुख्याध्यापकाला सांगून तिला तुझ्याशी बोलायला मी भागच अशी कशी शिक्षक बोलत नाही पाहू.

म्हणजे मुलांना शिस्त लावण्यासाठी शिक्षा घ्यायचीच नाही पण शिस्तीची अपेक्षा शाळेकडून नेहमी ठेवायची विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य मिळत असेल तर त्याचबरोबर कर्तव्य सुद्धा पूर्ण करायचे असतात जबाबदारीसुद्धा पाळायची असते. याचा संस्कारच आजकालच्या विद्यार्थ्यांमध्ये रूजत नाही शिक्षक हे सुधारण्याचे प्रवेशद्वार असते. शिक्षकाणी विद्यार्थ्यांना प्रेम, आणि स्वातंत्र्य देऊन त्याची मन जिंकायची असतात पण हे करण्याच्या प्रक्रियेमध्ये शिस्त लावण्यासाठी काही अधिकार शिक्षकांना सुद्धा लागतात. मारणे जबर शिक्षा करणे हे अधोरीच आहे ते केव्हाच कालबाह्य झाले आहे. आणि आजकालचे शिक्षक याचे समर्थपणा करणार नाहीत पण सध्याच्या काळात साधे रागावणे विद्यार्थ्याच्या भल्यासाठी छोट्या-छोट्या शिक्षा करणे सुद्धा पालकाच्या दबावापोटी बंद झाले आहे. याचा विद्यार्थ्यावर दुरगामी खूप वाईट परिणाम होतो.

विद्यार्थ्यांना अपमान पचवण्याचे मानसिक धैर्य राहत नाही असे विद्यार्थी तरूणपणी लवकरच नैराशयाच्या विहिरीत पडतात किंवा गळ्याला दोर बांधून फाशी घेतात. मला कोणी रागवत असेल तर ते माझ्या फायद्यासाठी आहे कुणीही शिक्षक आनंदासाठी कट काढण्यासाठी विद्यार्थ्याला रागवत नसतो ते रागवतात याचा सरळ अर्थ विद्यार्थी कुठेतरी चुकतो आहे पण विद्यार्थ्याची धारणा घेऊन जाते कि मला कोणीही रागावू नये ओरडू नये या धारणेने विद्यार्थी मोठा होतो आणि मग पुढे आयुष्यात वावरताना नोकरी करताना व्यवसायामध्ये समाजात लोकांशी वागताना जड जाते कारण जग आपल्या म्हणण्यानुसार नाही चालत.

आयुष्यात मान अपमान हे दोन्ही येत राहते. मारण हे अयोग्यच त्याला मी काय कोणीही समर्थन करणार नाही पण वर्गात रागावण सुद्धा आजकाल बंद झाले आहे. त्यामुळे अपमान कसा सहन करावा आणि त्यातुन Self analysis कसे करावे. ही प्रक्रियाच मुलांच्या मनात होत नाही जी सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहे.

काही झाले कि पालक, शिक्षकांशी चर्चा करायला येतात ज्यामध्ये चर्चेचा सुर कमी आणि कोर्टात जसे आरोपीला प्रश्न विचारतात तसेच पालक शिक्षकांना विचारतात या सर्व संवादामुळे मुलाच्या मनात शिक्षकांविषयीच्या आदर निघून जातो आणि विद्यार्थी हेच शिकतो कि मला काही अडचण आली तर आहे माझी आई-त्याच्या प्रत्येक (चुकीच्या) निर्णयामध्ये आई सहभागी होते. ती स्वतः निर्णय घेते. ती इतकी Involve होते कि त्याचा अपूर्ण राहीलेला होमवर्क प्रोजेक्ट अभ्यास ती स्वतः पूर्ण करते. पाल्य दुसऱ्यावर अवलंबून राहायला शिकतो. स्वावलंबनाचे धडे लहानपणी घ्यायचे असतात तो/ती विसरून जाते. ही मुल मोठी झाली आणि घरात आग लागली तरी फ्रायर ब्रिगेडला फोन करायचा असतो. हे सुद्धा त्यांना लवकर सुचत नाही एवढे ठोम्बे बनतात कारण लहानपणापासून मुलासाठी आपण Readymade answer देत होतो.

जेव्हा विद्यार्थ्याच्या मनात शिक्षकाबद्दल आदर असतो श्रद्धा असते तेव्हा शिक्षक जेव्हा वर्गात शिकवतात तेव्हा अंतर्मनाची द्वारे आपोआप उघडली जातात आणि शिक्षक जे शिकवतात ते लक्षात राहण्याची शक्यता अधिक असते जेव्हा पालक विद्यार्थ्यासमोर त्याच्या वर्ग शिक्षकांशी उद्धटपणे बोलतात किंवा सातत्याने भेटून तक्रारींचा पाढाच गात राहतात तिथे पाल्याच्या मनातील शिक्षकाबद्दलचा आदर कमी होत आहे.

**संशोधन समस्येची गरज**

१. आतंरक्रिया दोन मानवी मनामध्ये योग्य संवाद निर्माण करण्यास मदत करतात. पालक शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील शैक्षणिक हिताच नात अधिक समृद्ध होण्यासाठी सदरील विषयावर संशोधन करणे गरजेचे वाटले.

२. पालक शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रिया ह्या जर शैक्षणिकदृष्ट्या अनूकूल असतील तर त्याचा लाभ विद्यार्थ्यांना होऊ शकतो त्यामुळे औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील आंतरक्रिया नेमक्या कशा आहेत हे अभ्यासणे गरजेचे होते.

३. आज अनेक विद्यार्थी छोट्या अपयशामुळे देखील टोकाचा निर्णय घेतात त्यामुळे देखील या विषयावर संशोधन होणे गरजेचे आहे.

४. योग्य आंतरक्रियेमुळे योग्य परिणाम प्राप्त होत असल्याने औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये आंतरक्रिया होत आहेत का? हे अभ्यासणे गरजेचे वाटले.

५. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये शिक्षकांचे योगदान महत्त्वाचे असल्याने त्याच्या संदर्भातील आंतरक्रियेचा अभ्यास करणे गरजेचे वाटले.

**संशोधनाचे महत्त्व**

१. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या आंतरक्रियेचा अभ्यास केल्यास यांच्या मधील संवादातील अंतर कमी होण्यास मदत होईल.

२. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाची जडण-घडण करण्यासाठी विद्यार्थी पालक आणि शिक्षक यांच्यामधील आंतरक्रिया महत्त्वाच्या ठरतात या आंतरक्रिया विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनासोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वाच्या ठरतात.

३. वर्गातील वाढती विद्यार्थी संख्येमुळे देखील शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्याकडे पुरेसे वैयक्तिक लक्ष देऊ शकत नाहीत यासाठी काय करता येईल त्याकरीता ह्या विषयावर संशोधण करणे महत्त्वाचे ठरते.

४. २१ व्या शतकात माहिती तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थी कुठेही कमी पडू नये तसेच त्याचा समतोल विकास व्हावा या दृष्टीने सदरील संशोधन महत्वाचे आहे.

५. शिक्षक पालक विद्यार्थी यांच्यातील अनुकूल आंतरक्रिया असतील तर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी संशोधन महत्वाचे आहे.

**गृहीतके**

१. शाळेत विद्यार्थी संख्या जास्त असल्यामुळे शिक्षक इच्छा असूनही सर्व विद्यारर्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करू शकत नाही.

**संशोधनाची उद्दिष्टये**

१. औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील शैक्षणिक आंतरक्रियांचा अभ्यास करणे.

२. औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील शैक्षणिक आंतरक्रियांचा अभ्यास करणे.

३. औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील शैक्षणिक आंतरक्रियांमधील येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.

४. औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांच्यातील प्रतिकूल आंतरक्रियांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनातील येणाऱ्या समस्यांवर उपाययोजना सूचविणे.

५. औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील प्रतिकूल आंतरक्रियांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनातील येणाऱ्या समस्यांवर उपाययोजना सूचविणे.


**संशोधन परिकल्पना**

१. औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील पालक, शिक्षक यांच्यातील शैक्षणिक आंतरक्रियात अनेक समस्या असाव्यात.

**कोष्टक क्र. १: शाळेतील शिक्षक व विद्यार्थी, पालक हे तीनही घटक एकत्र राहून एकमेकांचे निरीक्षण करून विविध उपक्रम राबवल्याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | स्नेहसंमेलन | १८ | १८ |
| २. | पुस्तक व शैक्षणिक साधनांचे प्रदर्शन | ०७ | ०७ |
| ३. | आनंदनगरी | ३५ | ३५ |
| ४. | वरील सर्व | ४० | ४० |
| | **एकूण** | **१००** | **१००** |

**आलेख क्र. १ : शाळेतील शिक्षक व विद्यार्थी, पालक हे तीनही घटक एकत्र राहून एकमेकांचे निरीक्षण करून विविध उपक्रम राबवल्याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता**




**विश्लेषण**

कोष्टक क्रमांक १ मधील माहितीनुसार १८% शिक्षकांनी स्नेहसंमेलन या पर्यायास प्रतिसाद दिला तर ०७% शिक्षकांनी पुस्तक व शैक्षणिक साधनाचे प्रदर्शन या पर्यायास प्रतिसाद दिला. तर ४०% शिक्षकांना आनंदनगरी या पर्यायास प्रतिसाद दिला. तर ३५% शिक्षकांनी इत्यादी वरील सर्व या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. २ : शालेय वातावरणात मुलांना मदत करणारे, पाठबळ देणारे शाळा व पालक, स्थानिक समुदायाचे नाते दृढ करण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | पालक-शिक्षक संघ | २८ | २८ |
| २. | पालक सभा | १७ | १७ |
| ३. | स्थानिक समित्या | १३ | १३ |
| ४. | माजी विद्यार्थी संघ | १६ | १६ |
| ५. | व्हॉट्सअप ग्रुप निर्मिती | २६ | २६ |
| ६. | इतर | | |
| | **एकूण** | **१००** | **१००** |

**आलेख क्र. २ : शालेय वातावरणात मुलांना मदत करणार पाठबळ देणारे शाळा व पालक स्थानिक समुदायाचे नाते दृढ करण्याबाबतचा माहिती दर्शविणारा आलेख**





**विश्लेषण**

कोष्टक क्रमांक २ मधील माहितीनुसार २८% शिक्षकांनी पालक-शिक्षक संघ या पर्यायास प्रतिसाद दिला. तर १७%शिक्षकांनी पालक सभा या पर्यायास प्रतिसाद दिला. तर १३% शिक्षकांनी स्थानिक समित्या स्थापनया पर्यायास प्रतिसाद दिला. तर १६% शिक्षकांनी माजी विद्यार्थी संघ स्थापन केला या पर्यायास प्रतिसाद दिला. तर २६% शिक्षकांनी वॉट्सअप ग्रुप निर्मिती या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र.३ : शाळेतील शिक्षक परिसरातील कोणकोणत्या तज्ज्ञ पालकांना आजपर्यंत शाळेत बोलविले याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | इंजिनिअर | १५ | १५ |
| २. | डॉक्टर | १५ | १५ |
| ३. | नर्स | १० | १० |
| ४. | नृत्यकार | १० | १० |
| ५. | संगीतकार | १५ | १५ |
| ६. | समउपदेशक | २० | २० |
| ७. | योगा शिक्षक | १५ | १५ |
| | **एकूण** | **१००** | **१००** |

**आलेख क्र. ३ : शाळेतील शिक्षक परिसरातील कोणकोणत्या तज्ज्ञ पालकांना आजपर्यंत शाळेत बोलविले याबाबत माहिती दर्शविणारा आलेख**




**विश्लेषण**

कोष्टक क्र. ३ मधील माहितीनुसार १५% शिक्षकांनी इंजिनिअरसला बोलावतात. तर १५% शिक्षक डॉक्टरला बोलावतात. तर १०% शिक्षक नर्स बोलावतात.


१५% शिक्षकांनी संगितकार यांना बोलावले तर १०% शिक्षकांनी नृत्यकार यांना बोलावले तर २०% शिक्षकांनी समुपदेशक यांना बोलावतात. तर १५% शिक्षकांनी योगा शिक्षकांना बोलावतात.

**कोष्टक क्र. ४ : कोणत्या समस्याकडे लक्ष देतात याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | प्रगती विषयी | ३० | ३० |
| २. | आरोग्याविषयी | २० | २० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | विषयानुसार | ०० | ०० |
| ४. | शैक्षणिक समस्या विषयी | २० | २० |
| ५. | छंदाविषयी | १० | १० |
| ६. | स्वयं स्वच्छताविषयी | २० | २० |
| | **एकूण** | **१००** | **१००** |

**आलेख क्र. ४ : कोणत्या समस्याकडे लक्ष देतात याबाबत माहिती दर्शविणारा आलेख**





**विश्लेषण**

कोष्टक क्रमांक ४ मधील माहितीनुसार ३०% शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीविषयी लक्ष देतात या पर्यायास प्रतिसाद दिला तर वर्गातील विद्यार्थ्यांच्या कोणत्या समस्येकडे लक्ष २०% शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्याविषयी लक्ष देतात या पर्यायास प्रतिसाद दिला तर २०% शिक्षकांनी शैक्षणिक समस्या विषयी लक्ष देतात या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% शिक्षकांनी छंदाविषयी समस्येकडे लक्ष देतात या पर्यायास प्रतिसाद दिला तर २०% शिक्षकांनी स्वयं स्वच्छताविषयी समस्येकडे लक्ष देतात या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. ५ : विद्यार्थ्यांना आनंद झाल्यास कशा प्रकारे साजरा करतात या बाबत माहिती दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **पर्याय** | **प्रतिसाद** | **शे. प्रमाण** |
|---|---|---|---|
| १. | डबा पार्टी करण्यासाठी मित्राच्या घरी जातात. | २०० | २० |
| २. | गार्डनमध्ये फिरायला जाणे | ३०० | ३० |
| ३. | नाटक /सिनेमा बघायला जाणे | १०० | १० |
| ४. | ऐतिहासिक संग्रहालय बघणे | २०० | २० |
| ५. | विज्ञान प्रदर्शन बघायला जाणे | १५० | १५ |
| ६. | मित्राला घरी बोलावणे | ५० | ५ |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

**आलेख क्र. ५ : विद्यार्थ्यांना आनंद झाल्यास कशा प्रकारे साजरा करतात या बाबत माहिती दर्शविणारा आलेख**





**विश्लेषण**

कोष्टक क्रमांक ४.३.१३ मधील माहितीनुसार २०% म्हणजेच २०० विद्यार्थी डबा पार्टी करण्यासाठी मित्राच्या घरी जातात या पर्यायास प्रतिसाद दिला तर ३०% विद्यार्थी गार्डनमध्ये फिरायला जातात या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% विद्यार्थी नाटक / सिनेमा बघायला जातात या पर्यायास प्रतिसाद दिला तर २०% विद्यार्थी ऐतिहासिक संग्रहालय बघायला जातात तर १५% विद्यार्थी विज्ञान प्रदर्शन बघायला जातात या पर्यायास प्रतिसाद दिला. तर ५% विद्यार्थी मित्राला घरी बोलावतात या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. ६ : विद्यार्थ्यांमध्ये खेळी-मेळीचे वातावरण राहण्यासाठी शिक्षक काय-काय करतात या बाबत माहिती दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **पर्याय** | **प्रतिसाद** | **शे. प्रमाण** |
|---|---|---|---|
| १. | योगा | ३९० | ३९ |
| २. | विपश्यना | ० | ० |
| ३. | क्रीडा व खेळ | २५० | २५ |
| ४. | नृत्य व संगीत | १९० | १९ |
| ५. | चित्र काढणे व रंग भरणे | १७० | १७ |
| ६. | यापेक्षा वेगळे | ० | ० |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

**आलेख क्र. ६ : विद्यार्थ्यांमध्ये खेळी-मेळीचे वातावरण राहण्यासाठी शिक्षक काय-काय करतात या बाबत माहिती दर्शविणारा आलेख**





**विश्लेषण**

कोष्टक क्रमांक ६ मधील माहितीनुसार ३९% विद्यार्थी योगा या पर्यायास प्रतिसाद दिला तर २५% विद्यार्थी क्रिडा व खेळ या पर्यायास प्रतिसाद दिला तर १९% विद्यार्थी नृत्य व संगीत या पर्यायास प्रतिसाद दिला तर १७% विद्यार्थी चित्र काढणे व रंग भरणे या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. ७ : विद्यार्थी खेळात भाग घेत असल्यास कोणत्या खेळात भाग घेता त्या खेळाची आवड कशी व केव्हा निर्माण झाली याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **पर्याय** | **प्रतिसाद** | **शे. प्रमाण** |
|---|---|---|---|
| १. | क्रिकेट (सचिन तेंडूळकर) (टी.व्ही.) | २०० | २० |
| २. | कबड्डी (शिक्षकांकडून) | ३०० | ३० |
| ३. | कुस्ती (आजोबाकडून) | २०० | २० |
| ४. | टेनिस (मित्राकडून) | २०० | २० |
| ५. | बुद्धिबळ (बाबाककडून) | १०० | १० |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

**आलेख क्र. ७ : विद्यार्थी खेळात भाग घेत असल्यास कोणत्या खेळात भाग घेता त्या खेळाची आवड कशी व केव्हा निर्माण झाली याबाबत माहिती दर्शविणारा आलेख**




**विश्लेषण**

कोष्टक क्रमांक ७ मधील माहितीनुसार २०% विद्यार्थी क्रिकेट खेळात व या खेळाची भाग होतो आवड सचिन तेंडूळकरला पाहून आवड निर्माण झाली या पर्यायास प्रतिसाद दिला तर ३०% विद्यार्थी कबड्डी खेळत भाग घेतो व या खेळाची आवड शिक्षकांकडून निर्माण झाली या पर्यायास प्रतिसाद दिला. तर २०% विद्यार्थी कुस्ती खेळत भाग घेतो. या खेळाची आवड त्याच्या आजोबाकडून निर्माण झाली. या पर्यायास प्रतिसाद दिला तर २० % विद्यार्थी टेनिस खेळतात या खेळाची आवड त्याला मित्राकडून निर्माण झाली तर १०% विद्यार्थी बुद्धिबळ खेळत भाग घेतो या खेळाची आवड त्यांच्या वडिलांकडून / बाबाकडून निर्माण झाली या पर्यायास प्रतिसाद दिला.

**निष्कर्ष**

१. ४०% शाळेतील शिक्षक व विद्यार्थी पालक हे तीनही घटक एकत्र राहून एकमेकांचे निरीक्षण व उपक्रम स्नेहसंमेलन पुस्तक व शैक्षणिक साधनाचे प्रदर्शन, आनंदनगरी अशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीत वाढ होईल.

२. २८ % एवढे सर्वाधिक पालक-शिक्षक संघ आहेत.

३. इंजिनिरअर, डॉक्टर, नर्स, नृत्यकार, संगीतकार, समुपदेशक व योगा शिक्षक इ. परिसरातील तज्ज्ञ व्यक्तींना शिक्षक शाळेमध्ये बोलावतात.

४. ३०% वर्गातील शिक्षक विद्यार्थ्यांच्या प्रगतीविषयी लक्ष देतात.

५. सर्वाधिक ३०%ò विद्यार्थ्यांना आनंद झाल्यास गार्डनमध्ये फिरायला जातात.

६. सर्वाधिक ३९% वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये खेळी मेळीचे वातावरण राहण्यासाठी शिक्षक दररोज योगा करायला लावतात.

७. सर्वाधिक ३० % विद्यार्थी कबड्डी खेळतात या खेळाची आवड शिक्षकांकडून निर्माण झाली.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. घोरमोडे के. यु. आणि घोरमोडे कला (२००६) : शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, प्रथम आवृत्ती, नागपूर : विद्या प्रकाशन.

२. पंडित प. ब. (२००८) : शिक्षणातील संशोधन, पुणे : नूतन प्रकाशन.

३. भांडारकर के. एम. (२०१०) : सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, तिसरी आवृत्ती, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.

४. सोनाली दातार (२०१३), ‘‘संगोपन पालकत्वाचे(, प्रथमावृत्ती, पुणे, उन्मेष प्रकाशन.

५. श्रुती पानसे (२००७), ‘‘अशी का वागतात मुल’’, पहिली आवृत्ती, पुणे, उन्मेष प्रकाशन.

६. रोहिणी चितळे (१९९२), ‘‘मुलाशी सुसंवाद’’, प्रथमावृत्ती, पुणे, उन्मेष प्रकाशन.

७. डॉ. अनुराधा सोवनी आणि माधुरी भिडे (२००७), ‘‘आपली मुले का बिघडतात’’, प्रथमावृत्ती, पुणे : उन्मेष प्रकाशन.

८. मुळे रां. शं. व उमाठे वि. तु. (१९९८), ‘‘शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे आवृत्ती ३ नुतन प्रकाशन, पुणे.

९. www.shodhganga.com

१०. www.maha.gov.in